आ.क्र.जि.अ.कृ.अ.व./ २४५६/२३
— कार्यालय —
जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, वर्धा
दिनांक २६/६/०२३

# महाराष्ट्र शासन
## कृषी विभाग

## जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, वर्धा यांचे कार्यालय

**पत्ता : जिल्हा सत्र न्यायालय जवळ, सिव्हिल लाईन, वर्धा**
**ई-मेल आय डी - dagriwar@gmail.com**

आत्मनिर्भर भारत पॅकेज अंतर्गत प्रधानमंत्री सुक्ष्म खाद्य उद्योग उन्नयन योजना अंतर्गत (PMFME) या केंद्र पुरस्कृत योजने अंतर्गत क्षेत्रीय अधिकारी (FLO) तथा तंत्र सहायक (कृषी प्रक्रिया) या पदासाठी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, वर्धा येथे सदर योजनेच्या मार्गदर्शक सूचनेतील अटी व शर्तीनुसार बंद लिफाफ्यातून अर्ज मागविण्यात येत आहेत सदरील पदासाठी आवश्यक पात्रता व अनुभव व सविस्तर मानधनाचा तपशील या अर्जाचा नमुना हा मा. जिल्हाधिकारी, वर्धा यांचे www.wardha.gov.in संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तरी सदरील पदासाठी अर्ज करण्याकरिता अंतिम तारीख 10 जुलै 2023 संध्याकाळी 6.00 वाजेपर्यंत आहे.

| अ.क्र. | पदनाम | शैक्षणीक अर्हता | अनुभव | मानधन |
|---|---|---|---|---|
| 1 | क्षेत्रीय अधिकारी (FLO) तथा तंत्र सहाय्यक (कृषी प्रक्रिया) | 1. मान्यताप्राप्त विद्यापिठातून मिळवलेली पदवी (अनिवार्य) BSC (Agri/Horti) B.Tech (Food / Agri) प्राधान्यक्रम पदव्यूत्तर MBA (अनुक्रमे) प्राधान्य – Finance / Production Management/ Business) M.Tech (Food), MSc (Agri / Horti / Food)<br>2. MS-CIT (अनिवार्य) – (संगणकावर कार्यालयीन कामकाज येणे आवश्यक) इंग्रजी / मराठी टायपिंग आवश्यक (अनिवार्य) | किमान 02 वर्ष अनुभव असणे आवश्यक | मासिक मानधन 28,800/- प्रति महिना. |

**नियम व अटी शर्ती :**

1. वरील निवड प्रक्रियेचे सर्व हक्क जिल्हा निवड समितीकडे राखीव आहेत.
2. उपरोक्त पूर्णतः कंत्राटी पद्धतीचे असल्याने कुठल्याही स्वरूपाचा नियमितपणाचा दावा करता येणार नाही तसेच या सेवेला नियमित सेवा समजण्यात येऊ नये.
3. सदरील पदाची निवड ही त्रयस्थ मनुष्यबळ पुरवठादार संस्थेमार्फत जिल्हास्तरीय निवड समिती कडून करण्यात येणार असून आपल्याला मानधन सदरील संस्थेमार्फत आपले खात्यावर जमा करण्यात येईल.

www.govnokri.in

Scanned with OKEN Scanner

4. जाहिरातीसाठी अर्ज सादर करताना दिलेल्या विहित नमुन्यातच मराठी भाषेत संगणकीय कृत टाईप करूनच सादर करण्यात यावा व विहित नमुन्यात अर्ज नसल्यास किंवा त्रुटी आढळून आल्यास आपला अर्ज बाद करण्यात येईल तसेच सदरील अर्जासोबत आपले परिचय पत्रक (बायोडाटा) जोडतांना फक्त मराठी भाषेतच जोडण्यात यावा.
5. अर्जासोबत आवश्यक असणारे शैक्षणिक पात्रता कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती सुस्पष्ट असाव्यात. सदरील अर्जासोबत आधार कार्ड, पॅनकार्ड यापैकी एकाची साक्षांकित प्रत जोडावी.
6. अर्ज सादर करतांना विहित पदांतील कामासंबंधीचा किंवा कृषी क्षेत्रातील कामासंबंधी अनुभव प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करणे अनिवार्य असेल.
7. सदरील जाहिरातीसाठी वयाची कमाल मर्यादा 33 वर्ष व किमान मर्यादा 28 वर्षे इतकी असेल.
8. उमेदवारांनी मुलाखतीच्या दिवशी आवश्यक कागदपत्राच्या मूळ प्रति स्वखर्चाने विहित ठिकाणी उपस्थित राहणे अनिवार्य राहील.
9. अर्जदाराने सादर केलेल्या माहितीची पूर्ण सत्यता पडताळून बघितली जाईल व त्यात काही त्रुटी व असत्यता आढळून आल्यास सदर उमेदवारी रद्द करण्यात येईल.
10. जाहिरातीसाठी अर्ज सादर करताना दिलेल्या विहित नमुन्यातच मराठी भाषेत संगणकीयकृत टाईप करूनच बंद लिफाफ्यातून तसेच लिफाफ्यावर अर्ज सादर करीत असलेल्या योजनाचा व पदाचा स्पष्ट उल्लेख असावा असे आढळून आल्यास आपला अर्ज रद्द करण्यात येईल.

**उपरोक्त नियम व अटी शर्तीचे पालन करून भरती प्रक्रियेची निवड करण्यात येईल याची नोंद घ्यावी.**

**जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी**
**वर्धा**

Scanned with OKEN Scanner

**क्षेत्रीय अधिकारी (FLO) तथा तंत्र सहाय्यक (कृषी प्रक्रिया) यांचे सेवा विविक्षित कामांसाठी घेण्याबाबत अर्ज.**

प्रति,

जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी,

वर्धा

विषय : आत्मनिर्भर भारत पॅकेज अंतर्गत प्रधानमंत्री सुक्ष्म खाद्य उद्योग उन्नयन योजना (PMFME) करीता क्षेत्रीय अधिकारी (FLO) तथा तंत्र सहाय्यक (कृषी प्रक्रिया) यांचे अर्ज बावत.

उपरोक्त विषयास अनुसरून आत्मनिर्भर भारत पॅकेज अंतर्गत प्रधानमंत्री सूक्ष्म खाद्य उद्योग उन्नयन योजनेकरिता (PMFME) करीता क्षेत्रीय अधिकारी (FLO) तथा तंत्र सहाय्यक (कृषी प्रक्रिया) या पदाकरिता मी अर्ज करू इच्छित आहे व योजनेच्या मार्गदर्शक सूचना मधील सदर पदाकरिताच्या अटी व शर्ती मी वाचल्या असून त्यानुसार मी अर्ज करीत असून त्याप्रमाणे मी काम करण्यास तयार आहे. माझी शैक्षणिक अहर्ता व अनुभव याची माहिती (biodata) व आवश्यक कागदपत्राच्या साक्षांकित प्रती सोबत सहपत्रित केलेल्या आहेत.

**प्रपत्र**

| अ. क्र. | नाव व पत्ता | वय | शैक्षणिक पात्रता | अनुभव आलेला तपशील | दुरध्वनी / मोबाईल क्रमांक | ई-मेल आयडी | इतर आवश्यक माहिती |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

ठिकाण :

दिनांक :

**आपला विश्वासू**

**नाव व स्वाक्षरी**

Scanned with OKEN Scanner